# कॉमिकच्या माध्यमातून ‘सायबर सुरक्षित भारता’चा संदेश

## शासकीय अभियांत्रिकीच्या सायबर शक्ती क्लबचा उपक्रम; विद्यार्थ्यांकडून विविध सायबर फसवणुकीचे प्रात्यक्षिकांसह सादरीकरण



कराड (लक्ष्मीपुत्र) - स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून नागरिकांना वाढत्या सायबर गुन्ह्यांपासून सावध करण्यासाठी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराडच्या 'सायबर शक्ती क्लब'तर्फे अभिनव सायबर जनजागृती अभियान राबविण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या सायबर विभाग आणि क्विक फाउंडेशनच्या सहकार्याने आयोजित या उपक्रमात विद्यार्थ्यांनी कॉमिक पुस्तिका, पोस्टर्स आणि भूमिकांच्या माध्यमातून सायबर सुरक्षेचा संदेश प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचविला.

डिजिटल व्यवहार, ऑनलाइन बँकिंग आणि सोशल मीडियाचा वापर वाढत असताना सायबर फसवणुकीचे प्रकारही वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर नागरिकांना सायबर गुन्ह्यांचे स्वरूप आणि त्यापासून बचावाच्या उपाययोजनांची माहिती मनोरंजक पद्धतीने देण्यात आली. विद्यार्थ्यांनी डॉक्टर, शिक्षक, विद्यार्थी, उद्योजक, वकील आणि बँक कर्मचारी अशा विविध भूमिका साकारल्या. काही विद्यार्थ्यांनी हॅकरच्या भूमिका करून सायबर फसवणुकीचे प्रकार प्रत्यक्ष सादरीकरणातून उलगडले.विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या आकर्षक पोस्टर्समधून डिजिटल अरेस्ट, ऑनलाइन बँकिंग फसवणूक, बनावट लिंक, सोशल मीडिया स्कॅम, फेक कॉल्स यांसह विविध सायबर गुन्ह्यांबाबत जनजागृती करण्यात आली. संशयास्पद लिंकवर क्लिक न करणे, अनोळखी व्यक्तींना वैयक्तिक माहिती न देणे, ऑनलाइन व्यवहार करताना दक्षता बाळगणे आणि आर्थिक माहिती सुरक्षित ठेवण्याचे आवाहन करण्यात आले.

‘Cyber Warriors’च्या माध्यमातून नागरिकांना या पुस्तिकांचे वाटप करण्यात आले. मनोरंजक कथांच्या माध्यमातून सायबर फसवणुकीचे प्रकार आणि त्यापासून बचावाचे मार्ग समजावून सांगण्यात आल्याने सायबर सुरक्षेचा संदेश सहज आणि प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजीव वाघ यांनी, विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले. सायबर सुरक्षेसारख्या महत्त्वाच्या सामाजिक विषयावर विद्यार्थ्यांनी घेतलेला पुढाकार उल्लेखनीय असल्याचे त्यांनी सांगितले.

सायबर शक्ती क्लबच्या समन्वयक डॉ. प्रियांका शिंदे यांनी, सायबर सुरक्षा ही केवळ माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची गरज आहे, असे सांगितले. यावेळी उपसंचालक डॉ. एस.के. पाटील, एमसीए विभागप्रमुख प्रा. भागवत पाटील, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. आळसुंदकर, अधिष्ठाता डॉ. उमेश देशपांडे, अधिष्ठाता प्रा. उमा पाटील, विभागप्रमुख प्रा. सुनील पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

### ‘सायबर सुरक्षित भारत’साठी सात खबरदाऱ्या

अनोळखी लिंकवर क्लिक करू नका. ओटीपी, पासवर्ड आणि बँकिंग माहिती कोणालाही देऊ नका. अनोळखी कॉलवरून आलेल्या सूचनांवर तातडीने विश्वास ठेवू नका. सोशल मीडियावरील संशयास्पद संदेशांपासून सावध राहा. ऑनलाइन व्यवहार करताना अधिकृत संकेतस्थळे व ॲपच वापरा. ‘डिजिटल अरेस्ट’सारख्या फसवणुकीला बळी पडू नका. कोणत्याही संशयास्पद व्यवहाराची तातडीने माहिती द्या.